वस्त्रोद्योग विभाग, व वस्त्रोद्योग संचालनालय ई-गव्हर्नन्स योजना राबविण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार संस्थेची माहे मार्च २०१७ व एप्रिल २०१७ ची देयके Ernst & Young LLP, Mumbai या कंपनीस अदा करणेबाबत. (देयकाची रक्कम रु.१५.४०.०००/-

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन ज्ञापन क्रमांक : सववि-३५१६/प्र.क्र.२३१/१६-स,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०५ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ - १. शासनाचे पत्र क्र.CTD-३५१६/C.R.२३१/१६-C, दि.१५.०२.२०१७
२. Ernst & Young LLP.,Mumbai या कंपनीची माहे मार्च २०१७ व एप्रिल २०१७ ची देयके.
३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दि.१८.०४.२०१७
४. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दि.३०.०६.२०१७.

प्रस्तावना

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत वस्त्रोद्योग विभाग व वस्त्रोद्योग संचालनालय ई-गव्हर्नन्स योजना राबविण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून Ernst & Young LLP.,Mumbai या कंपनीस संदर्भाधिन क्र.१ च्या दि.१५.०२.२०१७ च्या वर्क ऑर्डरन्वये देण्यात आलेले आहे. सदर सेवेपोटी कंपनीने माहे मार्च २०१७ आणि एप्रिल २०१७ या कालावधीकरीता रु.१७.७१.०००/- इतक्या रकमेची देयके शासनास सादर केली आहेत. सदर देयकांचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

अ.क्र.	देयकाचा कालावधी	देयकाचा क्रमांक	देयकाची रक्कम	प्रत्यक्ष देय रक्कम
१.	दि.०१.०३.२०१७ ते दि.३१.०३.२०१७	IINL०१००३८७७०१	८,८५,५००.००	८,८५,५००.००
२.	दि.०१.०४.२०१७ ते ३०.०४.२०१७	IINL०१००३८७६९५	८,८५,५००.००	८,८५,५००.००
एकूण			**१७,७१,०००.००**	**१७,७१,०००.००**

प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.२१.११.२०१३ च्या बैठकीमध्ये मान्यता घेवून व २९.११.२०१७ च्या सादरीकरणानंतर Ernst & Young LLP.,Mumbai या कंपनीच्या सेवा घेण्याचे मान्य करण्यात आले आहे व तसे कंपनीला विभागाच्या दि.१५.०२.२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सबब कंपनीची देयके अदा करण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही असे दि.०४ जानेवारी, २०१७ रोजी झालेल्या विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत समितीने निर्देशित केले आहे. आता रु. १७,७१,०००/- इतकी रक्कम Ernst & Young LLP.,Mumbai या कंपनीस अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

ज्ञापन :-

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांना कळविण्यात येते की, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत सुरु करण्यात आलेल्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत प्रधान सचिव(वस्त्रोद्योग) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई. यांचे कार्यालयाकरिता एक प्रिन्सिपल कन्सलटंट व एक सिनियअर कन्सलटंट व नागपूर येथील वस्त्रोद्योग संचालनालय या कार्यालयाकरिता एक प्रिन्सिपल या मनुष्यबळासाठी Ernst & Young LLP या कंपनीकडून सेवा घेण्यात आली आहे. सदरच्या कासासाठी Ernst & Young LLP या कंपनीने माहे मार्च २०१७ आणि एप्रिल २०१७ या दोन महिन्यांच्या कालावधीच्या देयकाची रु. १७,७१,०००/- (रुपये सतरा लाख एकाहत्तर हजार फक्त) (सर्व करांसहीत) इतकी रक्कम अदा करण्यास या ज्ञापनान्वये मंजूरी देण्यात येत आहे. सादर केलेल्या देयकांमध्ये सल्लागारांचे , सेवाकर १४%(रू.१.०७.८००/- अक्षरी-एक लाख सात हजार आठशे रूपये फक्त), स्वच्छ भारत कर ०.५%(रू.३.८५०/- अक्षरी-तीन हजार आठशेहे पन्नास रूपये फक्त), कृषि कल्याण कर ०.५%(रू.३.८५०/- अक्षरी-तीन हजार आठशेहे पन्नास रूपये फक्त), असे एकूण रु.१.१५.५००/-(अक्षरी एक लाख पंधरा हजार पाचशेहे फक्त) दरमहा वजा जाता रु.१५.४०.०००/-(रुपये पंधरा लाख चाळीस हजार फक्त) इतकी रक्कम Ernst & Young LLP या कंपनीस अदा करण्यात यावी.

२. सदर रक्कम Ernst & Young LLP यांना अदा करण्यासाठी त्यांच्या बँक खात्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

Bank Name	-	STANDARD CHARTERED BANK Narain Manzil 23 Barakhamba Road D L
Current A/C No.	-	522-0-502390-4
Beneficiary	-	ERNST & YOUNG LLP
SWIFT CODE	-	SCBLINBBDEL
MICR	-	110036002
IFSC CODE	-	SCBL0036020

३. या ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आलेल्या रकमेचे आहरण करुन संबंधितांना वितरीत करण्याकरिता श्री.र.गं.बोडडू, कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

तसेच डॉ.सु.पो.गायकवाड, उप सचिव (आस्थापना), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. या ज्ञापनान्वये मंजूर केलेली रक्कम अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून आहरीत करुन संबंधितांना वितरित करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांनी करावी.

४. सदर खर्च मागणी क्रमांक "व्ही-२, ३४५१ सचिवालयीन-आर्थिक सेवा (००) (९०) सचिवालयीन, (०२) पंचवार्षिक योजनांतर्गतयोजना(०२)(०४)ई-गव्हर्नस कार्यक्रम (वस्त्रोद्योग) (३४५१२९७१) (योजनांतर्गत), १७ संगणक खर्च" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ व दि.३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

६.	सदर ज्ञापन शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ च्या परिशिष्टामधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला उप विभाग तीनच्या अनुक्रमांक चार परिच्छेद क्र.२७(२) नुसार प्रशासनिक विभागास असलेल्या शक्तीचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१००५१७१४५०९९०२ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2017.10.05 17:03:33 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (सहकार) यांचे स्वीय सहायक, स.प.व व. विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव (वस्त्रोदयोग), यांचे स्वीय सहायक, स.प.व व. विभाग, मंत्रालय, मुंबई
६) संचालक वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
७) उपसचिव (आस्था), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
८) कार्यासन अधिकारी (रोखशाखा), स.प.व व. विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) कक्ष अधिकारी, वित्त विभाग, व्यय-२/ वित्तीय सुधारणा, मंत्रालय, मुंबई
११) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, का-१४३१, मंत्रालय, मुंबई
१२)Director Ernst & Young LLP,५ th Floor Block B;◦-२ Nirlon Knowledge Park,Goregaon(E)
१३) निवड नस्ती/१६-स संग्रहार्थ